# नवी मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

### जा.क्र.न.मुं.म.पा/प्रशासन/आस्था-5/प्र.क्र.70/2024

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना शासन निर्णय कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संकीर्ण-2024/प्र.क्र.90/व्यशि-3, दि.9 जुलै, 2024 अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेत 6 महिन्यांच्या कालावधीकरीता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणेकामी 30 संवर्गातील एकूण 194 पदांसाठी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून दि.20.08.2024 रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. या बाबत सविस्तर जाहिरात. पदसंख्या व शैक्षणिक अर्हता शासनाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या अधिकृत पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याकरिता शिकाऊ अमेदवारांना पुढीलप्रमाणे विद्यावेतन शासनामार्फत देण्यात येईल.

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह विद्यावेतन रु. |
|---|---|---|
| 1 | 12 वी पास | रु.6,000/- |
| 2 | आय.टी.आय./पदविका | रु.8,000/- |
| 3 | पदीधर/पदव्युत्तर | रु.10,000/- |

याद्वारे पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, दि.14.08.2024 व दि.20.08.2024 रोजी सकाळी 10:00 वाजता शिबिराचे आयोजन नवी मुंबई महानगरपालिका (मुख्यालय), भुखंड क्र.1, सेक्टर 15 अ, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी करण्यात येत आहे. तरी, संबंधीतांनी आपले संपूर्ण नाव, पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रमांक, मेल-आयडी/शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख, बँक तपशिल व इ. कागदपत्रांसह उपरोक्त दिनांकास सदरील ठिकाणी उपस्थित रहावे. प्रथम येणाऱ्या उमेदवाराला प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

सदर नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाकडील दि.09.07.2024 रोजीच्या शासन निर्णयामधील सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील.

सही/-

**(डॉ.कैलास शिंदे)**

**आयुक्त**

**नवी मुंबई महानगरपालिका**

**स्थळ:- सी.बी.डी बेलापूर**

**दिनांक:- 12.08.2024**

जाक्रनमुंमपा/जसं/जाहिरात/192/2024

रोजगार मराठी